**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करते की,

माझे नाव – सुशिला रामनाथ कासार

माझे वय ६० वर्षे व्यवसाय शेती

राहणार शेरणखेल, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

१. दिनांक ३०.०३.२०१९ रोजी काय घटना घडली, हे मला माहित नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविलेला नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने सहा.सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.०३.२०१९ रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास मी, माझे दिर संजय राधाकिसन कासार, पुतण्या सुरज व माझी मोठी सासूबाई शांताबाई राधाकिसन कासार असे आमचे मोटारसायकल क्र.एम.एच.१४–सी.आर.३१४७ हिचेवरुन वस्तीवरुन शेरणखेल गावात सप्ताह असल्याने सप्ताहासाठी जात असताना घराचे घराचे थोडे पुढे आलो असता किनई ओढ्याजवळ पाझर तलावाचे जवळ असताना माझे दिर संजय यांचे लक्षात आले की, त्यांचा मोबाईल फोन घरी विसरला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी रोडचे कडेला मोटारसायकल उभी करुन आम्हा तिघांना तेथे थांबण्यास सांगून ते पायी जवळच काही अंतरावर असलेल्या त्यांचे घरी मोबाईल फोन आणण्यास गेले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही रस्त्याच्या कडेला उभे असताना अचानक समोरुन शेरणखेल गावाकडून पिंपळगावकडे जात असलेल्या एका मोटारसायकल स्वाराने

आम्च्या बाजूला येवून आम्हा तिघांना जोराची धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्या धडकेत आम्ही तिघे व मोटारसायकल रोडवर पडली व आम्हाला धडक देणा–या मोटारसायकलीवरील चालक हा देखील बाजूला जावून पडला. हे म्हणणे खरे नाही की, तो चालक पडल्यानंतर परत उठून तेथून निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, अपघातानंतर सप्ताहाकरिता आमच्या ओळखीचे पिंपळगावचे मारुती हरीभाऊ काळे हे तेथून जात असताना ते आम्हाला पाहून थांबले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी अपघातात धडक देणा–या मोटारसायकलीचा नंबर पाहिला होता व त्यांनी आम्हाला त्या मोटारसायकलीचा नंबर क्र.एम.एच.१७–२०५८ असा असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, काही वेळात माझे भाया संजय हे देखील तेथे आले व त्यांनी आम्हा तिघांना खाजगी वाहनातून अकोले येथील साबळे हॉस्पीटल येथे उपचारासाठी आणले. हे म्हणणे खरे नाही की, मला किरकोळ स्वरुपाचा मार लागल्याने साबळे डॉक्टर यांनी माझ्यावर औषधोपचार करून मला सोडले. हे म्हणणे खरे नाही की, माझी सासूबाई शांताबाई यांना पुढील उपचारासाठी कुटे हॉस्पीटल, संगमनेर येथे पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या उजव्या पायास गंभीर दुखापत होवून फ्रॅक्चर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील ती मोटारसायकल आरोपी गोविंद ज्ञानदेव वाळुंज हा चालवित होता व त्याचेकडून हा अपघात घडल्याचे मला समजले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या मोटारसायकलीवर मागे बसलेला अर्जुन हरिभाऊ लगड याच्या हातास देखील गंभीर दुखापत होवून त्याचे हाताचे हाड फ्रॅक्चर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की,आरोपी हा अपघातानंतर आम्हाला मदत न करता त्याचे वाहन घेवून पळून गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझा जबाब नोंदविला.

**३.** आता मला जबाबातील पोर्शन मार्क 'अ' व पुरवणी जबाबातील पोर्शन मार्क 'ब' मधील मजकूर वाचून दाखविला. तो मजकूर मी पोलिसांना सांगितलेला नव्हता. पोलिसांनी तसा मजकूर का नमूद केला आहे, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये, म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–</u>**

**४.** नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.23 17:53:40 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – २३.०३.२०२६**